ePaper

‖ वर्ष - 8 । अंक -175 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 4 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## बच्चू कडूंचा अखेर राजीनामा; दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्षपद सोडले!



### आतील पानांत


- रोहित शर्मा स्क्वॉडमध्येच नाही?
- भारताचं आक्रमक सेलिब्रेशन!
- मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार!
- भुजबळांकडून शरद पवारांचं कौतुक!


## अजित पवार यांचे मौन चर्चेचा विषय

# मुंडे अडचणीत, राजीनाम्याची मागणी!

### ❯❯ धनुभाऊंना कोणाचं बळ? राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात प्रश्नन

। मुंबई । महाईन्यूज

**बीडच्या केजमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी केसमध्ये वाल्मिक कराडला अटक झालेली आहे. कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा आहे. खुद्द मुंडे यांनीदेखील तशी कबुली दिलेली आहे. भाजप आमदार सुरेश धस सातत्यानं आका असा उल्लेख मुंडे यांना लक्ष करत आहेत. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं मौन चर्चेचा विषय आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेले अजित पवार शांत का? असा प्रश्न राजकीय वर्तुळातील सगळ्यांनाच पडला आहे.**



सरपंच देशमुख हत्या प्रकरणात कराड तुरुंगात गेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांची सीआयडीकडून चौकशी झालेली आहे. धनंजय मुंडे प्रचंड अडचणीत आलेले असताना अजित पवारांचं मौन सूचक मानलं जात आहे. धनंजय मुंडेंना धडा मिळत असतील तर तसं होऊ द्यावं, असा पवित्रा अजित पवारांनी घेतला आहे का, याची चर्चा पक्षातच दबक्या आवाजात सुरु आहे.

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना धनंजय मुंडे मंत्री होते. त्यावेळी त्यांच्यावर करुणा मुंडे यांनी गंभीर आरोप केले. त्यांनी पत्रकार परिषद घेतली. बीडमध्ये जाऊन तक्रार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आपल्यावर हल्ला झाल्याचा आरोप त्यांनी केला. मंत्री असलेल्या मुंडेंवर झालेले आरोप गंभीर असल्यानं त्याची दखल शरद पवारांनी घेतली. मुंडेंनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळेंची भूमिका होती. त्या अवघड परिस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मुंडेंची ठामपणे पाठराखण केली होती. शरद पवारांच्या विरोधात भूमिका घेत मुंडेंच्या पाठिशी ठामरणे उभे राहणारे अजित पवार आता पक्षाचे अध्यक्ष असताना गप्प आहेत. मुंडेंची प्रचंड कोंडी झालेली असताना त्यांनी भूमिका घेतलेली नाही. उलट भाजपचे आमदार या प्रकरणात घेत असलेल्या भूमिकेपेक्षा अधिक कठोर भूमिका अजित पवारांच्या पक्षाचे बीडमधील आमदार घेत आहेत. प्रकरणाचा तपास होईपर्यंत मुंडेंना बिनखात्याचं मंत्री करा, अशी भूमिका बीडमधील राष्ट्रवादीच्या आमदारांनी घेतलेली आहे. धनंजय मुंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडूनही गोची केली जात आहे. पक्षाच्या नेतृत्त्वाची मूकसंमती असल्याशिवाय अशा गोष्टी सहजा घडू शकत नाही. त्यामुळे राष्ट्रवादीत नेमकं घडतंय काय आणि अजित पवारांच्या मौनाचा नेमका अर्थ काय, असे प्रश्न सगळ्यांना पडले आहेत. पक्षातील एखादा नेता डोईजड होतो, तेव्हा त्याला अशाप्रकारे अडचणीत आणलं जातं. आता तेच मुंडेंसोबत घडतंय हा प्रश्न आहे.

### मुंडेंना नेमका कोणाचा आशीर्वाद मिळालाय

दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडेंना अभय दिलं आहे. या प्रकरणी राजकारण होत असल्याचं म्हणत फडणवीसांनी मुंडेंचा राजीनामा घेतला जाणार नसल्याचे संकेत दिले. कॅबिनेटची पहिली बैठक झाल्यानंतर मुंडेंचा आत्मविश्वास चांगलाच वाढलेला दिसला. मी राजीनामा का द्यावा आणि मी बीडचा पालकमंत्री काय होऊ नये, असे प्रश्न त्यांनी विचारले. त्यानंतर मुंडेंना नेमका कोणाचा आशीर्वाद मिळालाय, याची चर्चा सुरु झाली.

## खंडणी वाल्मीक कराडनेच मागितली

### ❯❯ अटकेतील आरोपी विष्णू चाटेचा सीआयडीसमोर कबुलीजबाब

। बीड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पवनचक्कीचे काम करणाऱ्या अवादा कंपनीकडे वाल्मीक कराड यानेच दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याची स्पष्ट कबुली विष्णू चाटे याने सीआयडीसमोर दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याच कबुलीजबाबाचा आधार घेत सीआयडीने केज न्यायालयात आवाजाचे नमुने घेण्यासाठी वेळ लागणार असल्याने कोठडी देण्याची मागणी केली होती. विष्णू चाटेच्या कबुलीमुळे वाल्मीक कराडचा पाय आणखी खोलात गेला आहे.**



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची पवनचक्कीच्या वादातून अतिशय अमानुष हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा माजी पदाधिकारी विष्णू चाटे याच्यासह जयराम चाटे, प्रतीक घुले, महेश केदार या चौघांना अटक करण्यात आली आहे. सीआयडीकडून या चौघांची कसून चौकशी करण्यात येत आहे.

सीआयडीसमोर या चौघांनी अनेक धक्कादायक खुलासे केल्याची माहिती सूत्रांनी दिली. या चौकशीत विष्णू चाटे याने वाल्मीक कराड यानेच अवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांशी मोबाईलवरून संपर्क साधला होता. दोन कोटी रुपयांची खंडणीही त्यानेच मागितली होती, अशी कबुली दिली असून याच आधारे सीआयडीने वाल्मीक कराडच्या आवाजाचे नमुने घ्यावयाचे असल्यामुळे कोठडी देण्याची मागणी केज न्यायालयात केली होती. केज न्यायालयाने ही मागणी मान्य करूनच वाल्मीक कराडची 14 दिवसांसाठी पोलीस कोठडीत रवानगी केली.

### सीआयडी कोठडीत काय तपासणार?

- कराडने अशाप्रकारे खंडणीचे आणखी गुन्हे केले आहेत का?
- या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का?
- आणखी किती व्यावसायिकांना खंडणीसाठी धमकी दिली?
- सरपंच हत्या व कंपनीच्या सुरक्षारक्षकाला मारहाणीच्या घटनेत सहभाग आहे का?
- अशाप्रकारच्या गुन्ह्यांमधून किती मालमत्ता मिळवली?
- कराडवर १५ गुन्हे दाखल, त्याचे आणखी साथीदार कोण?

# चुकलो तर समजावून सांगा : फडणवीस

## अराजकता निर्माण करण्यासाठी विदेशातील शक्तींनी षड्यंत्र केलं

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात अराजकता कशी निर्माण होईल. यासाठी देश विदेशातील शक्तींनी षडयंत्र केलं. वोट जिहाद सारखे विषय मांडून आमच्या विचारांवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. परंतु, जेव्हा- जेव्हा संतांनी धर्म आणि समाज जागरण केल. तेव्हा- तेव्हा विजय झाल्याचं बघायला मिळालं. असं विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आळंदीत केल आहे. देवेंद्र फडणवीस हे संत कृतज्ञता संवाद कार्यक्रमात बोलत होते. कुठे चुकलो तर समजावून सांगा.**



कधीही सत्ता आमच्या डोक्यात जाणार नाही. चुकलो तर आमचे कान धरा. संतच आम्हाला समजावून सांगू शकतात. आम्हाला कधीही वाटणार नाही. संत कोण होते आम्हाला सांगणारे. असे ही देवेंद्र फडणवीस यांनी अधोरेखित केले.देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकींनंतर आपल्या समोर एक प्रश्नचिन्ह निर्माण झालं होतं. देशात अराजकता कशी निर्माण करता येईल यासाठी देश विदेशातील शक्तींनी षड्यंत्र केलं. त्यांनी अराजकाची मांडणी केली. विविध भिंती मध्ये खंडित करता येईल. आमचं पौरुष कस समाप्त करता येईल. वोट जिहाद सारखे विषय मांडून एक प्रकारे आमच्या विचारांवर कस आक्रमण करता येईल. असा प्रयत्न आपल्या नजरेत आला. पुढे ते म्हणाले, जेव्हा- जेव्हा आमचा धर्म, संस्कृती, संस्कार कमजोर झाले त्या- त्या वेळी गुलामगिरीमध्ये गेलो. ज्या – ज्या वेळी संतांनी धर्म, समाज जागरण केलं तेव्हा दिग्विजयी भारत पाहायला मिळाला.पुढे ते म्हणाले, वोट जिहाद च्या भरवश्यावर आम्ही लोकसभा जिंकलो. आता विधानसभा जिंकू. त्यावेळी मात्र आता जर आपण जागे झालो नाही तर पुढचा प्रहार हा राजसत्तेवर नाही तर धर्मसत्तेवर आहे. अस वाटायला लागलं. संतांनी गावोगावी जागरण उभं केलं यातून हा आमचा विजय झाला. पुढे ते म्हणाले, कुठे आम्ही चुकलो तर तुमचा अधिकार आहे. तुम्ही कान धरू शकता. तुम्ही सांगू शकता. मी एवढंच निश्चितपणे सांगतो. कुठे चुकलो तर मार्ग दाखवा समजावून सांगा. कधीही सत्ता आमच्या डोक्यात जाणार नाही. आम्हाला कधी असं वाटणार नाही की संत कोण होते आम्हाला सांगणारे. आम्हाला माहिती आहे. संतच आम्हाला सांगू शकतात. याची खात्री आम्हाला आहे. चुकलो तर आमचे कान धरा. आम्हाला समजावून सांगा. आमच्या चुका आम्ही सुधारू आणि सन्मार्गाने चालण्याचा प्रयत्न हा निश्चितपणे आम्ही करू असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला आहे.कधीही सत्ता आमच्या डोक्यात जाणार नाही. चुकलो तर आमचे कान धरा. संतच आम्हाला समजावून सांगू शकतात. आम्हाला कधीही वाटणार नाही. संत कोण होते आम्हाला सांगणारे. असे ही देवेंद्र फडणवीस यांनी अधोरेखित केले.देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकींनंतर आपल्या समोर एक प्रश्नचिन्ह निर्माण झालं होतं. देशात अराजकता कशी निर्माण करता येईल यासाठी देश विदेशातील शक्तींनी षड्यंत्र केलं.

### दिग्विजयी भारत पाहायला मिळाला

विविध भिंती मध्ये खंडित करता येईल. आमचं पौरुष कस समाप्त करता येईल. वोट जिहाद सारखे विषय मांडून एक प्रकारे आमच्या विचारांवर कस आक्रमण करता येईल. असा प्रयत्न आपल्या नजरेत आला. पुढे ते म्हणाले, जेव्हा- जेव्हा आमचा धर्म, संस्कृती, संस्कार कमजोर झाले त्या- त्या वेळी गुलामगिरीमध्ये गेलो. ज्या – ज्या वेळी संतांनी धर्म, समाज जागरण केलं तेव्हा दिग्विजयी भारत पाहायला मिळाला.पुढे ते म्हणाले, वोट जिहाद च्या भरवश्यावर आम्ही लोकसभा जिंकलो. आता विधानसभा जिंकू. त्यावेळी मात्र आता जर आपण जागे झालो नाही तर पुढचा प्रहार हा राजसत्तेवर नाही तर धर्मसत्तेवर आहे. अस वाटायला लागलं. संतांनी गावोगावी जागरण उभं केलं यातून हा आमचा विजय झाला. पुढे ते म्हणाले, कुठे आम्ही चुकलो तर तुमचा अधिकार आहे. तुम्ही कान धरू शकता. तुम्ही सांगू शकता. मी एवढंच निश्चितपणे सांगतो. कुठे चुकलो तर मार्ग दाखवा समजावून सांगा.

# पुणे ते मुंबई अंतर अर्ध्या तासाने कमी होणार!

## 90 टक्के काम पूर्ण; नवी मुंबई विमानतळ आणखी वेगात गाठता येणार!

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**येत्या चार महिन्यांत मुंबईसह पुणेकरांसाठीही अत्यंत सोयीच्या ठरणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन होणार आहे. त्यातच आता पुण्यावरून मुंबई गाठण्यासाठी लागणाऱ्या वेळात किमान अर्ध्या तासाचा फरक पडणार असल्यामुळे पुणेकरांसाठी ही दिलासादायक बाब ठरणार आहे.**



पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील लिंक रोडचं काम जवळपास ९० टक्के पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. यामुळे पुण्यापासून नवी मुंबई विमानतळावर जाण्याचा वेळही कमी होणार आहे.लोणावळा शहराच्या बाहेरून द्रुतगती मार्गाला समांतर जाणारा लिंक रोड लवकरच तयार होऊन प्रवाश्यांच्या वापरासाठी खुला करण्यात येणार आहे. सध्या पुणे ते मुंबई हे अंतर साधारणपणे १६० किलोमीटर आहे. त्यावरून पुण्याहून मुंबईला पोहोचण्यासाठी अंदाजे ४ तासांचा वेळ लागतो. पण पुण्याहून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं अंतर अवघं १२० किलोमीटर आहे. त्यातही लोणावळ्याजवळील बायपास लिंक रोडमुळे पुण्याहून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत जाण्याचा वेळ अवघा २ तासांपर्यंत कमी झाला आहे.लोणावळ्याजवळील लिंक रोडचं काम जवळपास ९० टक्के पूर्ण झालं आहे. पुण्याहून मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्यांचा किमान अर्धा तास या लिंक रोडमुळे कमी होईल. हा प्रकल्प पूर्ण करण्याची डेडलाईन जूनमध्ये आहे. वेगाने काम होत आहे. आम्हाला कल्पना आहे की नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एप्रिलमध्ये पूर्ण होत आहे आणि लोकांना विमानतळापर्यंत कमीत कमी वेळात पोहोचायचं असेल. पण लिंक रोडमध्ये दोन बोगदे आणि दोन पुलांचा समावेश आहे. त्यामुळे घाईगडबडीत आम्हाला कोणतीही जोखीम पत्करायची नाही", अशी माहिती एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंते राकेश सोनावणे यांनी दिली.या लिंकरोडमुळे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाचं अंतर ६.५ किलोमीटरनं कमी होईल. कारण खोपोली एक्झिटपासून कुसगाव सिंहगड इन्स्टिट्युटपर्यंतचा पूर्ण पट्टाच प्रवाश्यांना या लिंकरोडमुळे टाळता येऊ शकेल. हा लिंकरोड १३.३ किलोमीटर लांब आहे. यापैकी ८.९ किलोमीटरचा भाग डोंगरांमधून जातो तर १.७ किलोमीटरचा बोगदा आहे. याशिवाय या मार्गात अनुक्रमे ८४० मीटर आणि ६५० मीटरचे दोन केबल ब्रिज आहेत.

### घाटातील भाग टाळण्याचा प्रयत्न

या प्रकल्पाची एकूण किंमत ६ हजार ५९५ कोटी आहे. घाटातला रस्त्याचा पूर्ण भाग टाळून थेट पुढे जाता यावं, यासाठी हा लिंक रोड तयार करण्यात येत आहे. यातून खोपोली ते कुसगावपर्यंतचा टप्पा शून्य अपघात क्षेत्र करण्याचा मानस या प्रकल्पाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न असेल. याशिवाय घाटाच्या परिसरात होणारा वाहतुकीचा खोळंबाही यामुळे कमी करता येऊ शकेल. २०१९ साली या प्रकल्पाचं काम सुरू झालं होतं. २०२२ मध्येच हा प्रकल्प पूर्ण होणं अपेक्षित होतं. पण मध्यंतरी आलेल्या करोनाच्या साथीमुळे हे काम रखडलं. आता जून २०२५ पर्यंत काम पूर्ण होईल असं प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

## अठरा हजार लघुउद्योजक त्रस्त

# उपक्रेंद्राला ‘विजेचा’ झटका!

### मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगरमधील प्रस्ताव धुळखात

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या दहा वर्षांपासून पाठपुरावा सुरू असलेल्या लघुउद्योजकांच्या उपकेंद्र उभारण्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळेनासा झाला आहे. मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर या तीन ठिकाणी उपकेंद्र विस्तारित करण्याचा प्रस्ताव मंजूर आहे. मात्र, हा प्रस्ताव धुळखात पडून आहे. उपकेंद्र नसल्याने दर दिवशी खंडित वीज पुरवठ्याने उद्योजक त्रस्त आहेत. कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. ही उपकेंद्र प्रत्यक्ष अस्तित्वात आल्यास पिंपरी, चिंचवड, भोसरी परिसरातील सुमारे १८ हजार उद्योजकांना त्याचा फायदा होणार आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे १८ हजार लघुउद्योजक आहेत. या औद्योगिक परिसराला सध्या बालाजीनगर, सेंच्युरी एंका, इंद्रायणीनगर, टाटा मोटर्स, तळवडे आदी भागातील वीज केंद्रातून विद्युत पुरवठा केला जात आहे. या केंद्राची असणारी क्षमता वाढविण्याची मागणी उद्योजक करत आहेत. औद्योगिक परिसरातील खंडित वीज पुरवठ्यावर मार्ग काढण्यासाठी तीन ठिकाणच्या उपकेंद्रातील मेगावॅटची मर्यादा वाढविणे प्रस्तावित आहे. मोशी, भोसरी येथील सेंच्युरी एन्का आणि इंद्रायणीनगर येथील सेक्टर सात येथे उपकेंद्र प्रस्तावित आहेत. सेंच्युरी एंका येथे ५० मेगावॅटचे दोन ट्रान्सफॉर्मर बसविणे प्रस्तावित आहे. इंद्रायणीनगर येथेही ५० मेगावॅटचे उपकेंद्र होणार आहे. तसेच टेल्को कंपनीचे सध्या ५० मेगावॅटचे उपकेंद्र आहे. त्या ठिकाणी १०० मेगावॅटचे उपकेंद्र उभारावे, अशी मागणी उद्योजक करत आहेत. त्याबाबत महावितरणने मंजुरी देखील दिली असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, महापारेषणने उपकेंद्र उभारायचे काम असल्याचे सांगितले जात आहे. सध्या एका फिडरवर सुमारे चारशे कंपन्यांचा भार आहे. शंभर कंपन्यांचा अतिरिक्त भार होत असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे एका वेळी ३०० कंपन्यांचा पुरवठा बंद झाल्याने उद्योजकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे त्वरित यावर उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

> “उपकेंद्र उभारणीबरोबरच ज्या जुन्या वीजवाहिन्या आहेत. त्यांची वेळेत देखभाल दुरुस्ती होणे गरजेचे आहे. फिडरची संख्या वाढवली पाहिजे. त्याची लांबी केल्यास त्यावरचा ओव्हरलोड कमी होईल. त्यामुळे वीज पुरवठा सुरळीत होईल.
>
> - **प्रमोद राणे,** उद्योजक.

#### फिटिंग स्टेशनला मिळेना जागा

फिटिंग स्टेशन उभारल्यास तिथून सर्व औद्योगिक परिसराला वीजपुरवठा केला जाऊ शकतो. त्यासाठी सुमारे एक हजारांपासून १५ हजार स्क्वेअर फूट जागेची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए आणि एमआयडीसी आदींनी त्यासाठी जागेची तरतूद करावी, अशी मागणी उद्योजकांकडून होत आहे.

#### उद्योजकांच्या मागण्या

- प्रस्तावित मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर येथील उपकेंद्र उभारणीला गती द्यावी.
- फिडरची संख्या वाढवून लांबी कमी करावी.
- टेल्को कंपनीचे १०० मेगावॅटचे उपकेंद्र करावे.
- फिटिंग स्टेशनसाठी महापालिका, एमआयडीसी, पीएमआरडीएने जागा उपलब्ध करून द्यावी.
- ४५ वर्षांपूर्वी असणारी जुनी वीजवाहिनी यंत्रणा बदलावी.
- फिडर, रोहित्राची वेळेत देखभाल दुरुस्ती करणे.
- रोहित्र, ट्रान्सफॉर्मर आदींच्या वस्तूंची चोरी रोखावी.
- खंडित वीज पुरवठ्याची समस्या सोडविण्यासाठी उपकेंद्रासाठी सुमारे अडीच हजार कोटींचा खर्च करावा.

> “मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर येथील उपकेंद्र उभारणीसाठी दहा वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. एकदाच सुमारे अडीच हजार कोटींचा खर्च केल्यास सर्वच यंत्रणा अत्याधुनिक उभारता येतील. त्यामुळे शहरातील १८ हजार उद्योजकांना होणारा त्रास कमी होणार आहे. उद्योजकांचे खंडित वीज पुरवठ्यामुळे होणारे नुकसानही थांबेल.
>
> **-संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघु उद्योजक संघटना.**

> “तळवडे, चऱ्होली आणि मोशी येथे २२० केव्ही अति उच्च दाबाचे उपकेंद्र उभारणीला महावितरणकडून मंजुरी दिली आहे. तसा प्रस्ताव महापारेषणकडे पाठविला आहे. उपकेंद्र उभारणीचे काम महापारेषणचे आहे. महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून मंजुरीबाबत कळवले आहे.
>
> **-निशिकांत राऊत,** जनसंपर्क अधिकारी, महावितरण.

---

## नदीकिनारा घाट की कचरा डेपो?

### उद्यानाच्या प्रवेशद्वारासमोर मोकळ्या जागेत उघड्यावर टाकला जातोय कचरा

। जुनी सांगवी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**येथील पवना घाट परिसर, पवना नदीकिनारा पूरसंरक्षक भिंतीवरून थेट नदीपात्रात नागरिकांकडून कचरा टाकला जात असल्याने पवना नदी घाट व परिसरात प्रदूषणात भर पडत आहे. नागरिकांना येथे कचरा टाकण्यापासून प्रतिबंध करणे आरोग्य विभागाला आव्हान बनले आहे.**



पवना नदी घाट व श्री वेताळ महाराज उद्यान प्रवेशद्वारासमोर असलेल्या मोकळ्या जागेत नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षांपासून उघड्यावर कचरा टाकला जात आहे. काही अंतरावर आरोग्य विभागाचे कचरा संकलन केंद्र आहे. असे असतानाही येथे सकाळी व रात्री कचरा साचला जातो. उद्यानाच्या प्रवेशद्वारासमोरच उघड्यावर कचरा टाकला जात असल्याने नागरिक या उद्यानाकडे येण्याचे टाळतात. त्यामुळे येथील कचरा रोखण्यात यावा, अशी नागरिकांमधून मागणी होत आहे.

तसेच, पवना नदी काठावरील सीमाभिंतीवरून नागरिकांकडून टाकण्यात आलेल्या कचऱ्यामुळे नदीपात्र की कचरा डेपो असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. नदीपात्रात फेकलेल्या कचऱ्याचा ढीग वाढत चालला असून, नदीपात्रात पडणारा कचरा रोखण्यात यावा, येथे उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी पर्यावरण प्रेमींकडून केली जात आहे. कचरा कुंडी मुक्त प्रभाग या संकल्पनेची काही नागरिकांकडून अंमलबजावणी होत नसल्याने काही नागरिक पूर्वी ठेवण्यात येत असलेल्या कचराकुंडीच्या मोकळ्या जागेत कचरा टाकतात.

> “उघड्यावर कचरा पडण्यापेक्षा अशा ठिकाणांचा कचरा रोखण्यात यावा. दंडात्मक कारवाईसह प्रबोधन व इतर उपाययोजना कराव्यात. घरोघरी कचरा तुंबणार नाही याची घंटागाडी व इतर संकलनाद्वारे काळजी घ्यायला हवी.
>
> **–उज्वला ढोरे,** सामाजिक कार्यकर्त्या

> “येथील कचरा नियमित उचलला जातो. प्रत्येक घरातील कचरा संकलनासाठी कचरा संकलन गाड्या नियमित आहेत. नदीपात्रातील कचरा अनेकवेळा बाहेर काढण्यात आला आहे. या सर्व ठिकाणी उपाययोजना करण्यात येतील.
>
> **–स्नेहल सोनवणे,** आरोग्य निरीक्षक, जुनी सांगवी

# बेगडी चेहऱ्यामागची बेजबाबदारपणाची कोल्हे कुई !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



**छोट्या पडद्यावर दिसणारा नकली शिवाजी किंवा नकली संभाजी हा आपल्या आयुष्यात देखील खोटारडा आणि नकलीपणाचा बुरखा पांघरून वावरतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. देशप्रेमाचा आव आणायचा, स्क्रिप्ट रायटर ने लिहून दिलेले डायलॉग हाणायचे आणि वास्तवात मात्र ढोंगी राजकारण करायचे हा आता शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा सर्व परिचित असा गुण झाला आहे.**

बेगडी चेहऱ्यामागील बोगस देशप्रेम, समाजाच्या उद्धारासाठी केलेल्या पोकळ घोषणा आणि परिस्थितीप्रमाणे कोलांटउड्या मारण्याचा अलौकिक दुर्गुण डॉक्टर साहेबांच्या नसानसात भिनला आहे, हे आता वेगळे सांगण्याची गरज नाही, ते सिद्ध झालेलेच आहे.सर्वधर्मसमभावाचा ढोंगी नारा पिटत आमचा हा खासदार नेहमीच कोल्हेकुई करतो, छत्रपती शिवराय आणि छत्रपती शंभुराजे यांच्या नावाचा पुरेपूर वापर करून समाजात वावरतो, निवडून येतो आणि धर्मनिरपेक्षतेच्या लंब्याचौड्या बाता मारतो. प्रत्यक्षात, मात्र त्याचा हा नकली बुरखा वारंवार चव्हाट्यावर येतो आणि हा कोणाचाच नाही, हे सर्व समाजाच्या लक्षात येते. त्याचं झालं काय, ज्या शिरूर मतदार संघानं या बोगस लोकप्रतिनिधीला निवडून दिलं, त्या मतदार संघातील सुखदुःखामध्ये सहभागी होण्याचं त्यानं नेहमीच टाळलं आहे.. मग तो एखादा उत्सव असो, एखादं आंदोलन असो किंवा एखाद्या समाजाची अस्मिता सांभाळणारा भव्य दिव्य कार्यक्रम असो. आमच्या या नतद्रष्ट डॉक्टरांची अशा मोठ्या कार्यक्रमाला नेहमीच दांडी ही ठरलेली !

### भीमा-कोरेगाव शौर्य दिनाकडे पाठ

संपूर्ण समाजाच्या अस्मितेचा प्रश्न असलेला भीमा कोरेगाव येथे प्रचंड गर्दीत साजरा होणारा शौर्य दिनाचा कार्यक्रम. खास या कार्यक्रमासाठी म्हणून दूर दूर चे बांधव येतात, हजेरी लावून जातात. येथील कार्यक्रमावरूनच काही वर्षांपूर्वी दंगल उसळली होती, हा इतिहास ताजा आहे. पण, दोन्ही डगरींवर हात ठेवून स्वार्थाची पोळी भाजणारा येथील खासदार निवडून आल्यानंतर जो गायब झाला आहे, त्याचा शोध मात्र घ्यायला हवा. पुण्यामध्ये उपस्थित असतानाही त्यांनी या शौर्य दिनाकडे दुर्लक्ष केले याबद्दल आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मात्र संतापले आहेत. आपल्या देशाविषयी प्रत्येक भाषणामध्ये बेगडी प्रेम दाखवणारा डॉक्टर साहेबांचा चेहरा संपूर्ण मतदारसंघाला आता परिचयाचा झाला आहे. मतदार संघात माळी आणि मराठा असा अघोषित संघर्ष पेटवून द्यायचा, मतदारांना भुरळ पाडायची आणि निवडून यायचे, हा या खासदाराचा नित्याचाच कार्यक्रम झाला आहे.काही वर्षांपूर्वी भारतीय जनता पार्टीचे उंबरठे झिजवणारा हा खासदार ऐनवेळी हळूच राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात शिरला. त्या पक्षाच्या नेत्यांवर भुरळ पाडून मुख्य प्रवक्ता बनला, आणि मालिकांमध्ये केवळ शिवरायांची आणि शंभूराजांची भूमिका केली असल्यामुळे त्या भांडवलावर गर्दी खेचू लागला. मतदारांनी सुद्धा त्याला डोक्यावर घेतले आणि दोन वेळा निवडून दिले. पण, त्याच्या बेगडी प्रेमाचे वास्तव आता उघड्यावर पडले असून शौर्य दिनाच्या निमित्ताने त्याची अनुपस्थिती मात्र चांगलीच गाजली. अशा महत्त्वाच्या वेळी हा बोगस नेता नेहमीच गैरहजर असतो, हे जनतेच्या लक्षात आलं, आणि मग चर्चेला उधाण आलं.

### आळंदीच्या संजीवन सोहळ्यालाही अनुपस्थित

या नकली शिवाजीनं कोण कोणत्या प्रमुख कार्यक्रमाला दांडी मारली, याचा पाढाच मतदारसंघातील नागरिक वाचू लागले आहेत. आळंदी येथे पार पडलेल्या संजीवन सोहळ्याची डॉक्टर साहेबांची अनुपस्थिती हा देखील असाच चर्चेचा विषय होता. समाज कोणता हा भाग गौण आहे. पण, अशा कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यायला पाहिजे, ही सर्वसामान्यांची भावना असते आणि त्यालाच हे बेजबाबदार खासदार नेहमी हरताळ फासतात. डॉक्टर साहेबांच्या दांड्यांचा विषय झाला किंवा चर्चा झाली की दुसरा मुद्दा येतो, तो जेजुरीमध्ये चंपाषष्ठी सोहळ्याला त्यांनी मारलेल्या दांडीचा. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमालाही अनुपस्थित राहून डॉक्टर साहेबांनी आपला खरा चेहरा जेजुरीकरांना आणि मतदारसंघाला दाखवला आहे.

### शिवराज्याभिषेकची अनुपस्थिती खटकली

मतदार संघातील अनेकांच्या डोळ्यावर आली, ती डॉक्टर साहेबांनी शिवनेरीच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याला दाखवलेली अनुपस्थिती ! दूरदर्शनवरील मालिकांमध्ये डॉक्टर साहेबांनी साकारलेली शिवरायांची भूमिका संपूर्ण राज्यात आणि देशात गाजली होती. जनतासुद्धा त्यांच्याकडे प्रति शिवाजी म्हणून बघत होती. त्यानंतर त्यांची शंभुराजांची भूमिका देखील चांगलीच गाजली. त्यांच्या या भूमिका म्हणजे शिवराय आणि शंभुराजे यांच्या कर्तृत्वाचा आणि अठरा पगड जाती सांभाळणाऱ्या नेतृत्वाचा अपमान म्हणावा की काय ? अशी वागणूक डॉक्टर साहेबांनी वेळोवेळी दाखवली आहे. मुख्यतः, छत्रपती शिवरायांचा जन्म ज्या शिवनेरी गडावर झाला, तेथे साजऱ्या झालेल्या शिवराज्याभिषेक सोहळ्याला डॉक्टर साहेबांनी मारलेली दांडी विशेष चर्चिली गेली. वास्तविक, त्यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन शिवराज्याभिषेक सोहळा आयोजित करायला हवा होता. पण, त्यांना काळजी आहे ती फक्त आपल्या खासदारकीची ! निवडून आले की पुन्हा पाच वर्षे मतदार संघाची काळजी करायची नाही आणि या भागात फिरकायचे नाही असा पायंडा या दांडी बहाद्दर खासदाराने पाडला आहे.

### देशप्रेमाचा पुळका, प्रत्यक्षात उलटेच !

सतत कोल्हेकुई करणारा हा खासदार महत्त्वाच्या वेळी गैरहजर असतो, हे प्रत्येकाच्याच लक्षात आलं आहे. एखाद्या ठिकाणी प्रत्यक्ष हजर नसला, तरी त्यावर प्रतिक्रिया देण्याचा त्रास सुद्धा तो कधी घेत नाही. आपण किती देशप्रेमी आहोत, हे पटवून देण्याचा त्याचा प्रयत्न यशस्वी होऊ दे, पण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांवर कारवाई सुरू असताना तोंडातून चकार शब्द न काढणारा हा खासदार प्रत्येकासाठी निषेधाचा विषय झाला आहे. गेल्या वर्षभरात या परिसरात तब्बल 29 बांगलादेशी नागरिक आणि चार रोहिंग्यावर कारवाई झाली. पण डॉक्टर महाशय मात्र आपल्या वागणुकीमुळे त्यांच्या पक्षाला खड्ड्यात घालण्यात मश्गूल होते. त्यांनी चौकशी करण्याची तसदी सुद्धा घेतली नाही किंवा पुढील काय पावले असावीत याचे मार्गदर्शन देखील नागरिकांना,कार्यकर्त्यांना किंवा पोलिसांना केले नाही. बांगला देशातील हिंदूंवर होणारे अन्याय ते पाहत असतील पण इथे पकडलेल्या बांगलादेशीबाबत ठोस निर्णय घेण्यात त्यांनी कधीच पुढाकार घेतला नाही.

### कुदळवाडीत खासदार फिरकले का?

कुदळवाडी, चिखली येथील गोदामना लागलेल्या आगी नंतर विधानसभेत आमदारांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. कुदळवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक राहत असल्याचा दावा करण्यात आला होता आणि याच चिखली परिसरातून बांगलादेशी नागरिक किंवा रोहिंग्याना अटक केल्याच्या नोंदी आहेत. पण आमचे खासदार महाशय त्या दिशेने फिरकलेले सुद्धा नाहीत. यावर त्यांचे उत्तर ठरलेले असेल, की मी खासदार आहे. माझा संबंध लोकसभेत आहे. परंतु एक गोष्ट लक्षात घ्या, देशद्रोही अशा 370 व्या कलमाचा प्रश्न असो, वक्फ विधेयकाचा प्रश्न असो, आमचे हे खासदार त्यावरील चर्चेच्या वेळी आपले मत न मांडता सभात्याग करतात, आणि महत्त्वाच्या वेळी संसदेत देखील गैरहजर असतात, हे देखील सर्वांनी पाहिले आहे, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. असा 'डबल ढोलकी' खासदार शिरूर मतदार संघाला लाभावा, हे तेथील नागरिकांचे दुर्दैवच आहे. पण, आता पुढील निवडणुकीत या बेजबाबदार खासदाराला चपराक दिल्याशिवाय नागरिक गप्प बसणार नाहीत, हे वेगळे सांगायला नको !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भुजबळांकडून शरद पवारांचं कौतुक!

## छगन भुजबळ यांनी 2023 मध्ये सोडली पवारांची साथ

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावललं गेलं. त्यानंतर छगन भुजबळ यांनी जहा नहीं चैना वहा नहीं रैना म्हणत नाराजी बोलून दाखवली होती. तसंच मला निवडणुकीचं तिकिटच कशाला दिलं वगैरेही बोलून दाखवलं होतं. यानंतर छगन भुजबळ शरद पवारांच्या पक्षात जाणार की भाजपात जाणार? अशाही चर्चा सुरु झाल्या. दरम्यान पुण्यातल्या एका कार्यक्रमात शरद पवार आणि छगन भुजबळ एकाच मंचावर होते. त्यावेळी दोन नेत्यांमधल्या एका कृतीने लक्ष वेधलं आहे.**



सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने पुण्यात त्यांच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शरद पवार आणि छगन भुजबळ हे दोघं एकाच मंचावर आलेले पाहण्यास मिळाले. चाकण बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर सावित्रीबाई फुलेंचा पुतळा उभारण्यात आला आहे. याच कार्यक्रमात छगन भुजबळ आणि शरद पवार हे एकाच मंचावर दिसले. शरद पवारांच्या हस्ते सावित्रीबाई फुलेंच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छगन भुजबळ होते. सुरुवातीला हे दोन्ही दिग्गज नेते हे एकमेकांकडे पाहणंही टाळत होते. मात्र नंतर या दोन दिग्गजांनी जी कृती केली त्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी कार्यक्रमाच्या पत्रिकेवर एक संदेश लिहिला. तो संदेश त्यांनी बाजूलाच ठेवला. ज्यानंतर त्यांच्या शेजारी बसलेल्या छगन भुजबळ यांनी हा संदेश वाचला. काही सेकंद दोघांचा संवाद झाला आणि दोन्ही नेते हसूही लागले. कॅमेरात ही दृश्यं टिपली गेली आहेत. दरम्यान दोन दिग्गज नेत्यांच्या कृतीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत. छगन भुजबळ म्हणाले, “समता परिषदेच्या सभेत आम्ही शरद पवार यांच्याकडे मंडल आयोगाची शिफारस करण्याची मागणी केली होती. त्याची अंमलबजावणी पवार साहेबांनी केली. शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलले.. त्यांना या कार्यक्रमाला बोलवले ते योग्यच केलं” असं म्हणत छगन भुजबळ यांनी शरद पवार यांचं कौतुक केलं आहे. छगन भुजबळ हे गेल्या काही दिवसांपासून नाराज असल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे छगन भुजबळ हे अजित पवारांची साथ सोडू शकतात का? अशाही चर्चा रंगल्या आहेत. दरम्यान शरद पवारांची साथ जेव्हा अजित पवारांनी सोडली तेव्हा छगन भुजबळही अजित पवारांसह गेले. त्याबाबत शरद पवारांनी एक वक्तव्य केलं होतं तेव्हा चांगलाच हशाही पिकला होता. शरद पवार म्हणाले होते, “छगन भुजबळ मला म्हणाले की अजित पवारांनी नेमकं काय केलंय ते मी बघून येतो, ते असं म्हणाले आणि नंतर मी त्यांना मंत्रिपदाची शपथ घेतानाच पाहिलं.” असं वक्तव्य शरद पवार यांनी २०२३ मध्ये केलं होतं. महायुतीच्या सरकारमध्ये अजित पवार २०२३ मध्ये सहभागी झाले. त्यांना छगन भुजबळांनीही साथ दिली. त्या सरकारमध्ये ते मंत्री होते. मात्र देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळात छगन भुजबळ नाहीत. त्यामुळे ते नाराज झाल्याची चर्चा आहे. दरम्यान शरद पवार आणि छगन भुजबळ यांच्यात काही सेकंद झालेली ही चर्चा आणि संदेश लिहून तो वाचला जाणं या कृतीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चा सुरु झाल्या आहेत.सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने पुण्यात त्यांच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शरद पवार आणि छगन भुजबळ हे दोघं एकाच मंचावर आलेले पाहण्यास मिळाले. चाकण बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर सावित्रीबाई फुलेंचा पुतळा उभारण्यात आला आहे. याच कार्यक्रमात छगन भुजबळ आणि शरद पवार हे एकाच मंचावर दिसले. शरद पवारांच्या हस्ते सावित्रीबाई फुलेंच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छगन भुजबळ होते. सुरुवातीला हे दोन्ही दिग्गज नेते हे एकमेकांकडे पाहणंही टाळत होते.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी कार्यक्रमाच्या पत्रिकेवर एक संदेश लिहिला. तो संदेश त्यांनी बाजूलाच ठेवला.

### भुजबळ नाराज असल्याच्या चर्चा

ज्यानंतर त्यांच्या शेजारी बसलेल्या छगन भुजबळ यांनी हा संदेश वाचला. काही सेकंद दोघांचा संवाद झाला आणि दोन्ही नेते हसूही लागले. कॅमेरात ही दृश्यं टिपली गेली आहेत. दरम्यान दोन दिग्गज नेत्यांच्या कृतीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.छगन भुजबळ म्हणाले, “समता परिषदेच्या सभेत आम्ही शरद पवार यांच्याकडे मंडल आयोगाची शिफारस करण्याची मागणी केली होती. त्याची अंमलबजावणी पवार साहेबांनी केली. शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलले.. त्यांना या कार्यक्रमाला बोलवले ते योग्यच केलं” असं म्हणत छगन भुजबळ यांनी शरद पवार यांचं कौतुक केलं आहे.छगन भुजबळ हे गेल्या काही दिवसांपासून नाराज असल्याच्या चर्चा आहेत.

---

# अजित पवार बीडचे पालकमंत्री होतील का?

## पालकमंत्री पदाचा निर्णय त्यांच्या स्तरावर दोन दिवसांत होईल

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राज्यातील महायुती सरकाराच्या मंत्रिमंडळाचा विस्तार काही दिवसांपूर्वी झाला, त्यानंतर खातेवाटपही करण्यात आलं. मात्र, सरकार स्थापन होऊन एक महिना झाला तरी अद्यापही पालकमंत्री पदाबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री कोण होणार? याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत.**



यातच महायुतीच्या मंत्र्यांमध्ये पालकमंत्री पदावरून रस्सीखेच सुरु असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. यातच बीड जिल्ह्यात घडेलेल्या घटनांवरून बीडचं पालकमंत्री हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे किंवा मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वत: कडे घ्यावं, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आज राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मोठं भाष्य केलं आहे. ‘जोपर्यंत वरिष्ठ स्थरावर निर्णय होत नाही, तोपर्यंत पक्षांतर्गत निर्णय घेता येत नाही’,पालकमंत्री पदासंदर्भात सध्या अनेक चर्चा सुरु आहेत. त्यामुळे पालकमंत्री पदाचा निर्णय कधी होणार? असा प्रश्न सुनील तटकरे यांना पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. यावर बोलताना ते म्हणाले, “पालकमंत्री पदासंदर्भातील निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे चर्चा करून घेतील.

### सुनील तटकरे काय म्हणाले?

माझ्या माहितीप्रमाणे पालकमंत्री पदाचा निर्णय त्यांच्या स्थरावर दोन ते तीन दिवसांत होईल. महायुतीचे प्रमुख या नात्याने ते तिघेजण जो निर्णय घेतील तो निर्णय सर्वांना मान्य असेल”, असं सुनील तटकरे यांनी सांगितलं.रायगडच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीत सुप्त संघर्ष पाहायला मिळत आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री भरत गोगावले हे रायगडच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही असल्याचं बोललं जातं. दुसरीकडे मंत्री आदिती तटकरे या देखील पालकमंत्रिपदासाठी आग्रही आहेत. त्यामुळे महायुतीत पालकमंत्रिपदावरून रस्सीखेच सुरु असल्याची चर्चा आहे.

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार!

## पोलीस अधीक्षक जखमी, कांगपोकपीत मोठा तणाव

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या वर्षभरापासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना सातत्याने घडत आहेत. या हिंसाचाराच्या घटनामध्ये आतापर्यंत शेकडो लोकांचा मृत्यू झाला, तर हजारो लोक बेघर झाले आहेत. मात्र, तरी मणिपूरमध्ये अद्यापही शांतता प्रस्थापित झाली नसल्याचं पाहायला मिळत आहे. मणिपूरमधील हिंसाचाराच्या घटनांवरून विरोधी पक्षांकडून केंद्र सरकारला कायम लक्ष्य केलं जातं. यावर ३१ डिसेंबर रोजी मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी हिंसाचाराच्या मुद्द्यावरून खेद व्यक्त करत माफी मागितली होती. त्यानंतर आता नव्या वर्षात अर्थात २०२५ मध्ये तरी मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित होईल असं बोललं जात होतं. मात्र, मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उसळला आहे.**



कुकी बंडखोरांनी कांगपोकपीत प्रवेश करत शहरातील उपायुक्तांच्या कार्यालयावर हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात कांगपोकपीचे पोलीस अधीक्षक (एसपी) जखमी झाल्याचं वृत्त समोर येत आहे. आधी मोर्चा काढला आणि त्यानंतर प्रशासकीय मुख्यालयावर हल्ला केला असल्याचं सांगितलं जात आहे. या चकमकीत एक पोलीस अधीक्षक जखमी झाले आहेत. यानंतर कांगपोकपी शहरात तणाव निर्माण झाला आहे. तसेच पोलिसांचे येथील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मात्र, अद्याप त्या ठिकाणी तणाव असून पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, कांगपोकपी हा मणिपूरमधील जिल्हा आहे. त्या ठिकाणी कुकी आणि इतर आदिवासी समुदायांचे प्राबल्य आहे. या भागात याआधीही हिंसाचाराच्या घटना समोर आल्या होत्या. यानंतर आज एका गटाने थेट उपायुक्त कार्यालयावरच हल्ला केला. यामध्ये काही प्रशासकीय वाहनांचीही तोडफोड करण्यात आली. सध्या परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला आहे.मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटनांवरून ३१ डिसेंबर रोजी मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी राज्यात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर खेद व्यक्त करत माफी मागितली होती. ते म्हणाले होते की, “हे संपूर्ण वर्ष खूप दुर्दैवी होते. मला खेद वाटतो आणि गेल्या ३ मे पासून आजपर्यंत जे काही घडत आहे त्याबद्दल मी राज्यातील जनतेची माफी मागू इच्छितो. घटनांमध्ये अनेकांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले आहे आणि अनेकांना आपले घर सोडून जावे लागले. मला याचा खूप खेद वाटतो. मला सर्वांची माफी मागायची आहे”, असं मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी म्हटलं होतं.या हल्ल्यात कांगपोकपीचे पोलीस अधीक्षक (एसपी) जखमी झाल्याचं वृत्त समोर येत आहे. आधी मोर्चा काढला आणि त्यानंतर प्रशासकीय मुख्यालयावर हल्ला केला असल्याचं सांगितलं जात आहे. या चकमकीत एक पोलीस अधीक्षक जखमी झाले आहेत. यानंतर कांगपोकपी शहरात तणाव निर्माण झाला आहे. तसेच पोलिसांचे येथील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मात्र, अद्याप त्या ठिकाणी तणाव असून पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

### मला सर्वांची माफी मागायची आहे

यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, कांगपोकपी हा मणिपूरमधील जिल्हा आहे. त्या ठिकाणी कुकी आणि इतर आदिवासी समुदायांचे प्राबल्य आहे. या भागात याआधीही हिंसाचाराच्या घटना समोर आल्या होत्या. यानंतर आज एका गटाने थेट उपायुक्त कार्यालयावरच हल्ला केला. यामध्ये काही प्रशासकीय वाहनांचीही तोडफोड करण्यात आली. सध्या परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला आहे.मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटनांवरून ३१ डिसेंबर रोजी मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी राज्यात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर खेद व्यक्त करत माफी मागितली होती. ते म्हणाले होते की, “हे संपूर्ण वर्ष खूप दुर्दैवी होते. मला खेद वाटतो आणि गेल्या ३ मे पासून आजपर्यंत जे काही घडत आहे त्याबद्दल मी राज्यातील जनतेची माफी मागू इच्छितो. घटनांमध्ये अनेकांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले आहे आणि अनेकांना आपले घर सोडून जावे लागले. मला याचा खूप खेद वाटतो. मला सर्वांची माफी मागायची आहे”, असं मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी म्हटलं होतं.

# ‘औरंगजेब हवेली’ बिल्डरकडून जमीनदोस्त!

## मुबारक मंजिलला इतिहासात एक महत्त्वाचं स्थान आहे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशमधील आग्रा येथील १७ व्या शतकातील मुबारक मंजिल अर्थात मुघल वारसा स्थळ ज्याला ‘औरंगजेबाची हवेली’ म्हणून ओळखलं जातं. मात्र, ही ‘औरंगजेब हवेली’ आता जमीनदोस्त करण्यात आली आहे. यासह आणखी काही वारसा स्थळे जमीनदोस्त करण्यात आले आहेत.**



विशेष म्हणजे राज्य पुरातत्व विभागाने स्मारकाच्या संरक्षणासाठी अधिसूचना जारी केल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांत आग्रा येथे मोठ्या प्रमाणावर हे पाडकाम करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात असून पुरातत्व खात्याचे निर्देश धाब्यावर बसवल्याचं यावरून स्पष्ट होत आहे. या मुबारक मंजिलला इतिहासात एक महत्त्वाचं स्थान आहे. ज्याचे तपशील ऑस्ट्रियन इतिहासकार एब्बा कोच यांच्या ‘द कम्प्लीट ताजमहाल अँड द रिव्हरफ्रंट गार्डन्स ऑफ आग्रा’ या पुस्तकात दिलेलं आहे. औरंगजेबाच्या कारकिर्दीत बांधलेलं हे शाहजहान, शुजा आणि औरंगजेब यांच्यासह प्रमुख मुघल व्यक्तींचं निवासस्थान होतं. तसेच ब्रिटीश राजवटीत या संरचनेत बदल करून ‘कस्टम हाउस’ करण्यात आलं. पुढे १९०२ पर्यंत ते तारा निवास म्हणून ओळखलं जात होतं. दरम्यान, राज्य पुरातत्व विभागाने सप्टेंबरमध्ये एक अधिसूचना जारी केली होती. या अधिसूचनेत एका महिन्यात या जागेला संरक्षित स्मारक घोषित केल्याबद्दल हरकती मागवल्या होत्या. मात्र, त्यावर कोणीही आक्षेप घेतला नाही. दोन आठवड्यांपूर्वी लखनऊच्या अधिकाऱ्यांनी संवर्धन उपाययोजना सुरू करण्यासाठी घटनास्थळाला भेट दिली होती. मात्र, त्यांच्या भेटीनंतर काही दिवसांत लगेचच ‘औरंगजेब हवेली’ जमीनदोस्त करण्यात आली आहे.

### अहवाल सादर करण्याचे आदेश

या ठिकाणच्या स्थानिकांचा आरोप आहे की, एका बिल्डरने पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने आक्षेप घेतल्यानंतर आणि यमुनेच्या कडेला पोलीस चौकी असतानाही हे बांधकाम जमीनदोस्त केलं. स्थानिक रहिवासी कपिल वाजपेयी यांनी म्हटलं की, मी अधिकाऱ्यांकडे अनेक तक्रारी केल्या. पण कोणतीही कारवाई झाली नाही आणि पाडकाम सुरूच आहे. आतापर्यंत ७० टक्के पाडण्यात आलं आहे. आम्ही उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा विचार करत आहोत.

# प्रसिद्ध गायकाने ए आर रेहमान यांच्या कार्यपद्धतीवर केली टीका

गायक अभिजीत भट्टाचार्य यांनी ऑस्कर विजेते संगीतकार ए आर रेहमान यांच्याबरोबर काम करताना त्यांना आलेल्या अनुभवावर भाष्य केले आहे. अभिजीत यांनी रेहमान यांच्याबरोबर फक्त एकाच गाण्यावर काम केले आहे. 'ऐ नाजनीन सुनो ना' या गाण्यासाठी त्यांनी एकत्र काम केले आहे. अभिजीत यांनी ए आर रेहमान यांच्या रात्री काम करण्याच्या सवयीवरही भाष्य केले आहे. 'बॉलीवूड ठिकाणा'ला दिलेल्या मुलाखतीत, अभिजीत यांना त्यांनी ए आर रेहमान यांच्याबरोबर फक्त एकदाच का काम केले याबद्दल विचारले . त्यावर ते म्हणाले, "त्या काळात मला सर्व मोठ्या संगीतकारांकडून फोन येत होते. अनु मलिक, आनंद-मिलिंद, जतिन-ललित सर्वजण फोन करत होते. मी सतत डबिंगमध्ये व्यस्त होतो. मी रेहमान यांना भेटण्यासाठी गेलो आणि मला हॉटेलमध्ये थांबून ठेवण्यात आले."ते पुढे म्हणाले, "मी ठरवले की मी थांबणार नाही आणि मी सकाळी रेकॉर्डिंग करेन. मी घरी गेल्यानंतर मला रात्री २ वाजता स्टुडिओतून फोन आला आणि त्यांनी मला गायनासाठी बोलावले. मी त्यांना सांगितले की, मी झोपलो आहे. मी सकाळी गेलो, पण तिथे ते नव्हते. त्यांना नियमित वेळेत काम करण्याची सवय नाही. मला व्यवस्थित पद्धतीने काम करायला आवडते. आता क्रिएटिव्हिटीच्या नावाखाली जर तुम्ही म्हणाल की रात्री ३:३३ वाजता रेकॉर्डिंग होईल, तर मला हे पटत नाही."अभिजीत यांनी सांगितले की, "त्या दिवशी स्टुडिओत रेहमान यांचे सहाय्यक होते आणि तेच सगळं काम बघत होते. माझ्या रूममधील एअर-कंडिशनिंगमुळे मला सर्दी झाली होती. पण त्यांनी आग्रह केला की मी गाऊन दाखवावे. मी अनेक सुपरफ्लॉप चित्रपटांसाठी हिट गाणी गायली आहेत आणि हे त्यापैकी एक होतं. कोणीही तो चित्रपट पाहिला नाही. गाणं रेहमानचं आहे असं सांगून त्यांनी रेहमान यांना श्रेय दिले." अभिजीत पुढे म्हणाले, "मी रेहमान यांना विचारत राहिलो, पण मला ठाम उत्तर मिळालं नाही. एखादा कलाकार अशा गोष्टींमुळे मोठा किंवा लहान होत नाही... मला सांगण्यात आलं की, मी त्यांची वाट बघून त्यांना भेटून नंतर जावे . पण मी त्यांना सांगितले की, माझी आधीची काही कामे आहेत."

## सोनूला दिली होती 'दबंग 2'ची ऑफर

सोनू सूद बॉलीवूडमधील लोकप्रिय स्टार आहे. त्याने हिरोपेक्षा खलनायकाच्या भूमिकेतून चाहत्यांची मने जिंकली आहेत. २०१० मध्ये रिलीज झालेल्या सलमान खानच्या 'दबंग' चित्रपटात सोनू सूदने छेदी सिंहची भूमिका साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला होता. अलीकडेच सोनू सूदने एका मुलाखतीत त्याला 'दबंग २' मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका ऑफर झाली होती, पण त्याने ती नाकारली असे सांगितले आहे. 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीत सोनू सूद म्हणाला, "सलमान आणि अरबाज माझ्या कुटुंबातील सदस्यासारखे आहेत. त्यांनी मला 'दबंग २'मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका साकारण्यासाठी बोलावलं होतं, पण मी नकार दिला. कारण मला कोणत्याही प्रकारे ती भूमिका उत्साहित करत नव्हती. मी हे कारण त्यांना सांगितल्यावर त्यांनी "काही हरकत नाही" अशी प्रतिक्रिया दिली.सोनू सूद पुढे म्हणाला की, "'दबंग २'च्या प्रीमियरला सलमान खानने मला बोलावलं होतं आणि मी आनंदाने उपस्थित राहिलो". 'दबंग' चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये छेदी सिंहच्या भावाचा उल्लेख आहे.

## प्रार्थना बेहेरेने मागितली माफी



राज्यभरात आज शिवजयंतीचा जल्लोष पाहायला मिळत आहे. शिवजयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लातूरमधील एका कार्यक्रमात अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. त्यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.लातूरच्या उदगीर येथील एका मॉलच्या उद्घाटनासाठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी उद्घाटनादरम्यान शुभेच्छा देताना सलग चार-पाचवेळा तिने महाराजांचा एकेरी शब्दात उल्लेख केला. त्यामुळे लातूरमधील शिवभक्तांकडून तिचा निषेध करण्यात येत आहे. तसेच अभिनेत्रीच्या स्वागतासाठी लावण्यात आलेले बॅनरदेखील फाडण्यात आले आहेत. तसेच प्रार्थनाने आता माफी मागावी, अशी मागणी शिवप्रेमींकडून करण्यात येत आहे.मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री प्रार्थना बेहेरे लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे एका व्यापारी प्रतिष्ठानच्या कार्यक्रमासाठी आली होती. यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. अभिनेत्रीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. संतप्त झालेल्या शिवप्रेमींनी उदगीर शहरामध्ये अभिनेत्रीचे लागलेले बॅनर फाडत संताप व्यक्त केला. अभिनेत्रीच्या ही बाब लक्षात आल्यानंतर तिने नवा व्हिडीओ बनवून शिवप्रेमींची माफी मागितली आहे.प्रार्थना बेहेरेने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवभक्तांनी नाराजी दर्शवत तिच्या वक्तव्याचा जाहीर निषेध नोंदवला. अभिनेत्रीने जाहीर माफी मागावी अशी मागणी केली जात होती. अशातच आता अभिनेत्रीने एक व्हिडीओ शेअर करत जाहीर माफी मागितली आहे. प्रार्थना बेहेरे म्हणाली आहे,"आज मी उदगीर येथे किसान मॉलच्या उद्घाटनाला आले होते. तिथे आल्यावर माझ्याकडून चुकून काही बोलण्यात आले असेल तर त्या बद्दल मी तुम्हा सर्वांची माफी मागू इच्छिते. कृपा करून मला माफ करा, माझा त्या बोलण्याचा उद्देश चुकीचा नव्हता. मी परत म्हणते की छत्रपती शिवाजी महाराजांच्या

## अमिताभ बच्चन यांची पोस्ट चर्चेत...

अमिताभ बच्चन सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. ते अनेकदा सोशल मीडियावर फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. आता त्यांनी सोशल मीडियावर केलेली पोस्ट चांगलीच चर्चेत आहे. ही पोस्ट २०२४ मध्ये भारताने गमावलेल्या चार व्यक्तींबद्दल आहे. हा फोटो शेअर करून बिग बी यांनी जे कॅप्शन लिहिले, ते पाहून अनेक युजर्स व्यक्त झाले आहेत. अमिताभ बच्चन यांनी सरत्या वर्षाला निरोप देणारी एक पोस्ट केली. २०२४ मध्ये उद्योगपती रतन टाटा, चित्रपट निर्माते श्याम बेनेगल, तबला वादक झाकीर हुसेन आणि माजी पंतप्रधान मनमोहन सिंग या दिग्गजांचे निधन झाले. व्यंगचित्रकार सतीश आचार्य यांनी या सर्वांवर एक व्यंगचित्र काढलं. ते अमिताभ बच्चन यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केलं.अमिताभ बच्चन यांनी शेअर केलेल्या या व्यंगचित्रात दिवंगत रतन टाटा, चित्रपट निर्माते श्याम बेनेगल, तबला वादक झाकीर हुसैन आणि माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे फोटो आहेत आणि त्यावर २०२४ मध्ये एक पारशी, एक मुस्लीम, एक शीख आणि एका हिंदूचे निधन झाले आणि पूर्ण देश हळहळला. सर्वांनी त्यांचे एक भारतीय म्हणून स्मरण केले, असा मजकूर लिहिलेला आहे. हा फोटो शेअर करत 'हे चित्र सगळं सांगतंय,' असं बिग बींनी लिहिलं. बिग बी यांनी मध्यरात्री तीन वाजता ही पोस्ट शेअर केली. त्यांच्या पोस्टचे लोक खूप कौतुक करत आहेत. आपण सगळे एक आहोत ही प्रेरणा या पोस्टमधून मिळते, अशी कमेंट एका युजरने केली. तर, ही पोस्ट केल्याबद्दल खूप खूप धन्यवाद, असं एका युजरने लिहिलं. तुमच्या या पोस्टमधून लोक काहीतरी बोध घेतील.

## मला धूम्रपान करायला खूप आवडतं: विद्या बालन



आपल्या अप्रतिम अभिनयाच्या जोरावर विद्या बालनने इंडस्ट्रीत स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. टीव्हीपासून सुरुवात करणारी विद्या बॉलीवूडची आघाडीची अभिनेत्री बनली. दाक्षिणात्य अभिनेत्री सिल्क स्मिताची भूमिका तिने 'द डर्टी पिक्चर'मध्ये साकारली होती. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता आणि विद्याला त्यासाठी राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान विद्याला एक व्यसन जडलं होतं.'द डर्टी पिक्चर'नंतर विद्याला धूम्रपान करायची सवय लागली होती. तिने 'अनफिल्टर्ड बाय समदीश' या मुलाखतीत याबाबत माहिती दिली. सुरुवातीला ती ऑनस्क्रीन सिगारेट ओढायला तयार नव्हती, पण चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान तिला सिगारेटचं व्यसन जडलं, असं तिने सांगितलं आहे.विद्या म्हणाली, "या चित्रपटाआधी मी धूम्रपान केलं होतं, मला ते कसं करायचं हे माहित होतं, पण मी धूम्रपान करायचे नाही. पण एखादी भूमिका करताना तुम्ही धूम्रपान करण्याची नक्कल करू शकत नाही. आपल्याकडे धूम्रपान करणाऱ्या स्त्रियांबद्दल एक विशिष्ट समज आहे, त्यामुळे माझ्या चेहऱ्यावर तो संकोच असून चालणार नव्हतं. आता महिलांबद्दलचा हा समज खूप कमी झालाय, पण आधी तो खूप होता. 'द डर्टी पिक्चर' नंतर सिगारेटचं व्यसन जडलं आणि मी रोज दोन ते तीन सिगारेट ओढत असे.

# भारताचं आक्रमक सेलिब्रेशन!

## कॉन्स्टास पुन्हा एकदा खेळाडूंशी भिडताना दिसला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सिडनी कसोटीत सॅम कॉन्स्टासने बुमराहशी वाद घातल्याचा ऑस्ट्रेलियाला चांगलाच फटका बसला आहे. पाचव्या कसोटी जसप्रीत बुमराह टीम इंडियाचे नेतृत्व करत आहे. या सामन्यात बुमराहबरोबरच कॉन्स्टासने वाद घातला आणि मग कॉन्स्टासला याचं प्रत्युत्तर संपूर्ण संघाने मिळून दिलं. बुमराहने पहिल्या दिवसाच्या अखेरच्या चेंडूवर ख्वाजाची विकेट घेताच बुमराहसह भारतीय संघाने अनपेक्षित असं सेलिब्रेशन केलं ज्याचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.**




भारतीय संघ १८५ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर टीम इंडिया गोलंदाजीला उतरली. भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहने नेहमीप्रमाणे सामन्याच्या सुरूवातीला भारताला विकेट मिळवून देत आपली जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडली आणि त्याने दिवसाच्या शेवटच्या चेंडूवर उस्मान ख्वाजाला बाद केले.जसप्रीत बुमराह एक शांत गोलंदाज आहे, त्याला क्वचितच कोणीतरी संतापलेल्या किंवा प्रतिस्पर्धी संघाला उद्देशून करणारं सेलिब्रेशन करताना पाहिलं आहे. या सामन्यातही बुमराह गोलंदाजी करताना शांत दिसत होता, मात्र अचानक ऑस्ट्रेलियाचा युवा फलंदाज सॅम कॉन्स्टासने बुमराहशी वाद घालण्याचा प्रयत्न केला. ऑस्ट्रेलियाचा दुसरा सलामीवीर ख्वाजा फलंदाजी करत होता, तर बुमराह गोलंदाजीसाठी रनअप घेत होता, पण ख्वाजा तयार नव्हता. त्यामुळे पंच आणि ख्वाजा यांनी बुमराहला थांबण्याचे संकेत दिले. तर बुमराहने नाराजी व्यक्त करत ख्वाजाला काय असं विचारलं. दरम्यान,जे बुमराहला आवडलं नाही आणि दोन्ही खेळाडू आपापसात वाद घालताना दिसले. तिसऱ्या षटकाच्या पाचव्या चेंडूच्या आधी ही घटना घडली. यानंतर बुमराहने ५वा चेंडू टाकला जो डॉट बॉल होता. यानंतर षटकाच्या शेवटच्या चेंडूवर बुमराहने बाहेर जाणारा चेंडू उस्मान ख्वाजाला टाकला आणि त्याचा बचाव करण्याचा प्रयत्न करत असताना चेंडू उस्मानच्या बॅटच्या कडेला आदळला आणि केएल राहुलने स्लिपमध्ये अप्रतिम झेल घेतला.उस्मान ख्वाजा बाद होताच बुमराह स्वतःला रोखू शकला नाही आणि बुमराहने मागे फिरत कॉन्स्टसकडे जळता कटाक्ष टाकत आक्रमक सेलिब्रेशन केले. ख्वाजा बाद होताच भारताच्या संपूर्ण संघाने एकच जल्लोष करत कॉन्स्टासच्या समोर जात आक्रमक सेलिब्रेशने केले. कॉन्स्टासकडे यावर काहीच उत्तर नव्हते आणि तो दिवसाचा खेळ संपल्यावर उस्मान ख्वाजासह पॅव्हेलियनमध्ये परतला.भारतीय संघ १८५ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर टीम इंडिया गोलंदाजीला उतरली. भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहने नेहमीप्रमाणे सामन्याच्या सुरूवातीला भारताला विकेट मिळवून देत आपली जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडली आणि त्याने दिवसाच्या शेवटच्या चेंडूवर उस्मान ख्वाजाला बाद केले.जसप्रीत बुमराह एक शांत गोलंदाज आहे, त्याला क्वचितच कोणीतरी संतापलेल्या किंवा प्रतिस्पर्धी संघाला उद्देशून करणारं सेलिब्रेशन करताना पाहिलं आहे. या सामन्यातही बुमराह गोलंदाजी करताना शांत दिसत होता, मात्र अचानक ऑस्ट्रेलियाचा युवा फलंदाज कॉन्स्टासने बुमराहशी वाद घालण्याचा प्रयत्न केला.

### बुमराहचा जळता कटाक्ष

ऑस्ट्रेलियाचा दुसरा सलामीवीर ख्वाजा फलंदाजी करत होता, तर बुमराह गोलंदाजीसाठी रनअप घेत होता, पण ख्वाजा तयार नव्हता. त्यामुळे पंच आणि ख्वाजा यांनी बुमराहला थांबण्याचे संकेत दिले. तर बुमराहने नाराजी व्यक्त करत ख्वाजाला काय असं विचारलं. दरम्यान, सॅम कॉन्स्टास बुमराहने काहीतरी बोलण्यास सुरुवात केली, जे बुमराहला आवडलं नाही आणि दोन्ही खेळाडू आपापसात वाद घालताना दिसले. तिसऱ्या षटकाच्या पाचव्या चेंडूच्या आधी ही घटना घडली. यानंतर बुमराहने ५वा चेंडू टाकला जो डॉट बॉल होता. यानंतर षटकाच्या शेवटच्या चेंडूवर बुमराहने बाहेर जाणारा चेंडू उस्मान ख्वाजाला टाकला आणि त्याचा बचाव करण्याचा प्रयत्न करत असताना चेंडू उस्मानच्या बॅटच्या कडेला आदळला आणि केएल राहुलने स्लिपमध्ये अप्रतिम झेल घेतला.उस्मान ख्वाजा बाद होताच बुमराह स्वतःला रोखू शकला नाही आणि बुमराहने मागे फिरत कॉन्स्टसकडे जळता कटाक्ष टाकत आक्रमक सेलिब्रेशन केले.

---

# विश्रांती सोडा, रोहित शर्मा संघामध्येच नाही?

## गौतम गंभीरच्या सहीनिशी यादीचा फोटो व्हायरल!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा सिडनी कसोटीत खेळत नाहीये. त्याच्या जागी जसप्रीत बुमराहच्या हाती कर्णधारपद आहे. बुमराहने टॉसच्या वेळी सांगितले की, रोहितने स्वतः विश्रांती घेण्याचा पर्याय निवडला आहे. बरं, रोहित बाहेर बसणार असे संकेत सामन्यापूर्वीच मिळाले होते. पत्रकार परिषदेत मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरला विचारण्यात आले होते की, रोहित खेळणार का?**



यावर त्यांनी खेळपट्टी पाहून निर्णय घेतला जाईल, असे सांगितले होते. यानंतर भारतीय संघातील अधिकृत खेळाडूंची यादी व्हायरल होत आहे.नाणेफेकीच्या वेळी, प्रत्येक संघ आपापले प्लेइंग इलेव्हन जाहीर करतो. त्यानंतर ४ राखीव खेळाडूंची नावं दिली जातात. गरज पडल्यास हे खेळाडू मैदानात येऊ शकतात. या चार खेळाडूंमध्येही रोहित शर्माचे नाव नव्हते. देवदत्त पडिक्कलला १२वा, ध्रुव जुरेलला १३वा, अभिमन्यू ईश्वरनला १४वा, सर्फराझ खानला १५वा तर हर्षित राणाला १६वा खेळाडू बनवण्यात आले आहे. गौतम गंभीरच्या सहीनिशी असलेलल्या यादीचा फोटो व्हायरल होत आहे, ज्यामध्ये रोहितच्या नावाचा समावेश नाही. भारतीय संघात सध्या एकूण १९ खेळाडू आहेत. यापैकी केवळ तीन खेळाडूंची नावे यादीतून गायब आहेत. त्यात एक जखमी आकाश दीपचा समावेश आहे. रोहित शर्माशिवाय रविचंद्रन अश्विनच्या जागी संघात समाविष्ट करण्यात आलेल्या तनुष कोटियनचा संघाच्या यादीत समावेश नाही. आता यामागचे कारण संघ व्यवस्थापनच सांगू शकेल.

### रोहित कसोटीतून होणार निवृत्त?

रोहित स्टेडियममध्ये असून सामन्यापूर्वी मैदानावरही दिसला होता. कॅमेरा अनेक वेळा ड्रेसिंग रूममध्ये गेला असता रोहित दिसत होता. रोहित शर्मा ३७ वर्षांचा आहे. भारतीय संघ सिडनी कसोटीनंतर मे महिन्यापर्यंत या फॉरमॅटमध्ये कोणताही सामना खेळणार नाही. तोपर्यंत रोहित शर्मा ३८ पार करेल. जूनमध्ये वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल आहे आणि त्यानंतर भारताला इंग्लंडमध्ये टेस्ट सीरिज खेळायची आहे. अशा परिस्थितीत रोहित पुन्हा कसोटीत भारतासाठी दिसेल अशी आशा कमी आहे.